# —: प्रेस नोट :—

दिनांक ०५/१०/२०२१

दि.१८/०९/२०२१ रोजी १८.४५ वा.चे सुमारास, नियंत्रण कक्षाकडून स.का. पाटील उदयान, महर्षी कर्वे रोड येथे महिलांची छेडछाड होत असल्याबाबतचा संदेश प्राप्त होताच लो. टि. मार्ग पोलीस ठाण्याचे मोबाईल क्रमांक २ वरील पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी तात्काळ घटनास्थळी पोहचून सदर ठिकाणी छेडछेड करणाऱ्या इसमास ताब्यात घेवून पोलीस ठाण्यात आणले. महिला पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून लागलीच सदर तक्रारदार महिलेकडे सविस्तर चौकशी केली असता त्यांनी यातील आरोपी राजकुमार नारायण तांडेल, वय ५६ वर्षे, रा.ठि. ४६ ए, मच्छिमार नगर नंबर - २, कॅप्टन प्रकाश पेठे मार्ग, कुलाबा, मुंबई याने त्यांचा पाठलाग करून स.का.पाटील उदयान, महर्षी कर्वे रोड येथे त्यांना पॅन्टची चेन काढून गुप्तांग दाखवून त्यांचे स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले अशी माहिती दिल्याने त्यांचा सविस्तर जबाब नोंदवून यातील आरोपी विरूध्द लो. टि. मार्ग पोलीस ठाणे येथे गुरक्र. ११८१/२०२१,कलम-३५४, ३५४(अ)(१),३५४(ड) भादवि. प्रमाणे गुन्हा नोंद केला.

तपासी अधिकारी महिला पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव यांनी मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग श्री. दिलीप सांवत, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२ डॉ.सौरभ त्रिपाठी, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, पायधुनी विभाग श्री.शरद नाईक व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दिपक निकम यांच्या मार्गदर्शनाखाली लागलीच तपास सुरू केला. अटक आरोपीचा पूर्व अभिलेख पडताळला असता त्याचे विरूध्द कफ परेड पोलीस ठाणे येथे महिलांविरोधातील २ गुन्हे नोंद असून आझाद मैदान पोलीस ठाणे येथे १ गुन्हा नोंद असल्याची माहिती प्राप्त झाली. आरोपीस यापुर्वी दोन गुन्ह्यात दोषसिध्दी मिळाली आहे. आरोपीची गुन्हयांची पध्दत व घटनेचे गांभीर्य ओळखून महिलांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने सदर अटक आरोपी यांस जामीनावर सुटण्याची कोणतीही संधी मिळणार नाही याची सर्वतोपरी खबरदारी तपासी अधिकारी यांनी घेतली व वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ८ दिवसांत संपूर्ण गुन्हयाचा सर्वांगाने तपास पूर्ण करून अटक आरोपी विरूध्द सबळ व ठोस पुरावा गोळा करून मा. महानगर दंडाधिकारी, २८ वे न्यायालय, मुंबई यांचे न्यायालयात कोर्ट केस क्रमांक ६५०/पीडब्ल्यु/ २०२१, दिनांक २८/०९/२०२१ अन्वये दोषारोप पत्र दाखल केले. **नमूद कार्यवाही ही गुन्हा दाखल झाल्यापासून आठ दिवसात करण्यात आलेली असून यावरून असे दिसून येत आहे की, मुंबई पोलीस हे महिलांच्या सुरक्षिततेसाठी नेहमीच अग्रेसर व प्रयत्नशिल आहेत.**

मा. न्यायाधीश श्रीमती यशश्री मारूलकर, महानगर दंडाधिकारी, २८ वे न्यायालय, किल्ला कोर्ट मुंबई यांनी तपासी अधिकारी व सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. चौधरी यांनी दाखविलेली तत्परता व गुन्हयाचे गांर्भीय जाणून सदर गुन्हयाची संपूर्ण सुनावणी जलदगतीने केवळ सहाच दिवसांत पूर्ण करून नमूद आरोपीस दिनांक ०५/१०/२०२१ रोजी ३ वर्ष सश्रम कारावास व रू.१०००/- दंड, दंड न भरल्यास १ महिना सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

( दिपक निकम )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
लो.टि. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई.

Scanned with CamScanner